

# प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली नात्यांची 'बेरीज वजाबाकी'

पालक आणि किशोरवयीन मुलांमधल्या बदलत्या नातेसंबधांसह आजच्या शैक्षणिक पद्धतीवर मनोरंजक पद्धतीने 'बेरीज वजाबाकी' हा चित्रपट भाष्य करतो. काळाशी सुसंगत विषय, दमदार पटकथा आणि कलाकारांच्या उत्तम अभिनयाने सजलेल्या 'बेरीज वजाबाकी' या चित्रपटाला संपूर्ण महाराष्ट्रातील प्रेक्षकांच्या पसंतीची पावती मिळते आहे. जंपिंग टोमॅटो मार्केटिंग प्रा. लि. प्रस्तुत इन असोसिएशन विथ पीएमआरवाय प्रॉडक्शन निर्मित 'बेरीज वजाबाकी' या चित्रपटाचे दिग्दर्शन राजू भोसले यांनी केले आहे.

कुटुंब, समाज आणि शाळा या प्रक्रियेतून मुलांची जडणघडण होत असते. परंतु, आज पालक आणि मुलं यांच्यातील नाते वेळेअभावी आणि अनेक आधुनिक माध्यमांमुळे दुरावले आहे. मुलांच्या इच्छेला प्राधान्य देऊन त्यांना प्रोत्साहित केले पाहिजे, यातच कुटुबांचा आनंद आहे आणि तो आपण मिळवला पाहिजे, ही जाणीव या चित्रपटात करून देण्यात आली आहे. मोहन जोशी, नंदू माधव, उपेंद्र लिमये, प्रवीण तरडे, देविका दफ्तरदार, गिरीश परदेशी, मिलिंद गवळी, स्मिता शेवाळे, रमेश परदेशी यांचा उत्तम अभिनय आणि नील बक्षी, जाई रहाळकर, अमेय परदेशी, आदिश्री देशमुख, यश भालेराव, आर्या काकडे, शर्व कुलकर्णी, तन्वी सावरगावकर, रामदास अंधारे, सोहम महाजन, ओंकार जाधव, ओम चांदणे या बालकलाकारांची धमाल चित्रपटात पाहायला मिळते.

चित्रपटाला अभिजित नार्वेकर यांनी संगीत दिले असून, अंबरीश देशपांडे यांची गीते आहेत. 'आकाश हे...' या गीताला राशी हरमलकर, विश्वजा जाधव, मानस भागवत यांनी, तर 'क्षण हा विरला' गाण्याला सोनू निगम, आनंदी जोशी यांनी आपल्या सुरेल आवाजात स्वरबद्ध केले आहे. प्रत्येक शिक्षक आणि पालकाने अनुभवायला हवी अशी ही 'बेरीज वजाबाकी' आहे.

# नंदूची 'बेरीज-वजाबाकी'

अभिनेता नंदू माधव 'शाळा', 'हरिश्चंद्रची फॅक्टरी', 'वळू', 'टप्पा' या चित्रपटांनंतर आता ते 'बेरीज वजाबाकी' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. शिक्षण व्यवस्था आणि पालक-मुलांच्या नात्यावर हा चित्रपट आधारित आहे. या चित्रपटात ते एका शिक्षकाच्या भूमिकेत आहेत. याबाबत नंदू सांगतात, 'चित्रपटातील माझी भूमिका फार मोठी नसली तरी या भूमिकेला मी योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. मुलांनी पालकांना दाखवावा असा हा चित्रपट आहे.' नंदू यांच्यासोबत चित्रपटात अभिनेता उपेंद्र लिमये, मोहन जोशी, प्रवीण तरडे, मिलिंद गवळी, देविका दफ्तरदार, गायत्री देशमुख, स्मिता शेवाळे आदी कलाकार आहेत. राजू भोसले यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. पीएमआरवाय प्रॉडक्शन या बॅनरअंतर्गत चित्रपटाची निर्मिती झाली आहे.

